# व्यंगचित्रातून समाजप्रबोधन

डोंबिवली, ता. ११ (बातमीदार) : रोटरॅक्ट क्लब ऑफ डोंबिवली आणि द ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह यांच्या वतीने व्यंगचित्रातून समाजप्रबोधन करण्याच्या उद्देशाने 'प्रदूषण' या विषयावर आधारित व्यंगचित्र स्पर्धा शनिवारी (ता. १२) रोटरी सेवा केंद्र सभागृह, रघुवीरनगर, माधव आश्रमसमोर, डोंबिवली (पू.) येथे सायंकाळी सहा वाजता होणार आहे. स्पर्धकांनी व्यंगचित्रांतून आपले याविषयीचे विचार मांडायचे असून व्यंगचित्रांचे प्रदर्शन आनंद बालभवनात १३ जानेवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत खुले असणार आहे, अशी माहिती अध्यक्ष अमोल पाटील यांनी दिली.